**महाराष्ट्र शासन**

**वन विभाग**

दूरध्वनी क्र. ०७१२-२५५६७७३
Email ID:
apccfhrmadmn@gmail.com

**प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय**
**वनभवन, रामगिरी रोड, सिव्हिल लाईन्स, नागपूर ४४०००१**

---

**ई-मेलव्दारे**

क्रमांक : कक्ष-१०(२)/एक/MSCIT/प्र.क्र.१२१/(१८-१९)/३३८ नागपूर ४४०००१, दिनांक:१४/०६/२०२१

प्रति,

मुख्य वनसंरक्षक/वनसंरक्षक

(प्रादेशिक) सर्व

विषय:- वनरक्षक व वनपाल यांचे संगणक अर्हतेबाबत

संदर्भ:- १) या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-१०(२)/एक/MSCIT/प्र.क्र.१२१(१८-१९)/४४५, दिनांक १४/२/२०२० व समपत्र दिनांक १६/३/२०२०

२) शासन पत्र क्र. एफएसटी-१२/१९/प्र.क्र.३५३/फ-४, दिनांक ३१/५/२०२१

शासन पत्र दिनांक ४/४/२००७ च्या पत्रान्वये वनरक्षक, वनपाल, वाहनचालक, काळजीवाहक, महावत व हत्यारी पोलीस या संवर्गातील कर्मचाऱ्यांना MSCIT ची परीक्षा उत्तीर्ण करण्याची अट शिथिल केलेली आहे. यास्तव, सेवाप्रवेश नियम २०११ पूर्वी शासन सेवेत लागलेल्या वनरक्षक व वनपालांना शासन पत्र दिनांक ४/४/२००७ च्या पत्रान्वये संगणक अर्हता उत्तीर्ण करण्याची शिथिल केलेली अट आजही कायम असल्याचे कळविले आहे. तथापि, सन २०११ नंतर नियुक्त झालेल्या सदर कर्मचाऱ्यांना शासन अधिसूचना दिनांक ३०/६/२०११ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाचे वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.

तसेच, सामान्य प्रशासन विभागाच्या अभिप्रायानुसार शासनाने कळविले आहे की, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाच्या दिनांक २०/११/२०१८ च्या पत्रान्वये ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी विहित मुदतीत अनिवार्य संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर केलेले नाही, अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या वेतनाची वसुली करण्यास स्थगिती देण्यात आली आहे (प्रत संलग्न). सदर तरतूद ही ज्या वनरक्षक/वनपाल यांना वयाची ५० वर्षे पूर्ण झालेली नाहीत व अद्याप पर्यंत त्यांनी संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर केलेले नाही यांनाही लागू आहे.

संदर्भित शासन पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार आपलेस्तरावरून कार्यवाही करावी तसेच सदरील बाब आपले अधिनस्त असलेल्या कार्यालयाचे निदर्शनास आणून देण्यात यावे.

सहपत्र:- संदर्भित शासन पत्र

(विकास गुप्ता)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(प्रशासन दुय्यम संवर्ग)

19

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

दूरध्वनी क्र.०२२-२२८१३६२३
Email ID : ashok.lakkas@nic.in

क्रमांक: एफएसटी-१२/१९/प्र.क्र.३५३/फ-४ दिनांक : ३१ मे, २०२१.

635
6121

प्रति,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग),
महाराष्ट्र राज्य, नागपूर

**विषय: वनरक्षक व वनपाल यांचे संगणक अर्हतेबाबत**

संदर्भ: १. आपले क्र.कक्ष-१० (२)/एक/ MSCIT /प्रक्र.१२१(१८-१९)/३२२
दि.१८.११.२०१९ रोजीचे पत्र
२. आपले क्र.कक्ष-१० (२)/एक/ MSCIT /प्रक्र.१२१(१८-१९)/४४५ व ४९३
दि.१४.२.२०२०२० व दि.१६.३.२०२० रोजीचे पत्र

महोदय,

उपरोक्त विषयांकित प्रकरणी संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शासनपत्र दि.४.४.२००७ च्या पत्रान्वये वनरक्षक, वनपाल, वाहनचालक, काळजीवाहक, महावत व हत्यारी पोलीस या संवर्गातील कर्मचाऱ्यांना MSCIT ची परीक्षा उत्तीर्ण करण्याची अट शिथिल केलेली आहे. यास्तव, सेवाप्रवेश नियम २०११ पूर्वी शासन सेवेत लागलेल्या वनरक्षक व वनपालांना शासनपत्र दि.४.४.२००७ च्या पत्रान्वये संगणक अर्हता उत्तीर्ण करण्याची शिथिल केलेली अट आजही कायम आहे, ही आपण व्यक्त केलेली धारणा कायम करण्यात येत आहे. तथापि, सन २०११ नंतर नियुक्त झालेल्या सदर कर्मचाऱ्यांना शासन अधिसूचना, दि.३०.०६.२०११ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाचे वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.

मुउ (२)(१)
31/5/21

२. तसेच, सामान्य प्रशासन विभागाच्या अभिप्रायानुसार कळविण्यात येते की, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाच्या दि.२०.११.२०१८ च्या पत्राद्वारे ज्या अधिकारी / कर्मचाऱ्यांनी विहित मुदतीत अनिवार्य संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर केलेले नाही, अशा अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या वेतनाची वसुली करण्यास स्थगिती देण्यात आली आहे. (प्रत सोबत जोडली आहे) सदर तरतूद ही ज्या वनरक्षक / वनपाल यांना वयाची ५० वर्षे पूर्ण झालेली नाहीत व अद्यापपर्यंत त्यांनी संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर केलेले नाही यांनाही लागू आहे.

सहपत्र : वरीलप्रमाणे

(अ. का. लक्कस)
कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग

प्रत :-

(१) मुख्य वनसंरक्षक (मानव संसाधन व व्यवस्थापन), नागपूर (२) निवडनस्ती

२५४५

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक- मातंस २०१८/प्र.क्र.५३/से.५/३९.
सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान).
मंत्रालय, मुंबई-३२,
दिनांक: २० नोव्हेंबर, २०१८

प्रति,

१. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव सर्व मंत्रालयीन विभाग.
२. उपसचिव (आस्थापना) सर्व मंत्रालयीन विभाग.

**विषय:** संगणक अर्हता प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर न केल्यामुळे चालू असलेल्या वसूलीस स्थगिती देणे बाबत.

महोदय/महोदया,

शासकीय सेवेतील गट-अ, गट-ब व गट-क मधील सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिनस्त कार्यालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव या विभागाकडे प्राप्त झाला आहे. त्यास अनुसरून आदेशावरून कळविण्यात येते कि, ज्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांनी विहित मुदतीत अनिवार्य संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर केलेले नाही. अशा अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या वेतनाची वसूली करण्यास स्थगिती देण्यात येत आहे.

सदर बाब आपल्या विभागातील संबंधित अधिकारी व विभागाच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांच्या निदर्शनास आणण्यात यावी, व त्याप्रमाणे आवश्यक कार्यवाही करण्याबाबत निदेश देण्यात यावे. हि विनंती.

आपला,

(दि. प्र. देशमुख).
(प्र.)उप सचिव, साप्रवि
महाराष्ट्र शासन.